# रेशीमकोश विक्रीसाठी अडचण

## डॉ. जाधव ; कोश सुकवून त्याची काळजी घ्या



**कोल्हापूर, ता. २९ :** राज्यात संचारबंदी लागू झाल्याने रेशीमकोश विक्रीसाठी कोल्हापूर जिल्ह्याबाहेर नेण्यात अडचण आहे. शेतकऱ्यांनी कोश सुकवून त्याची काळजी घ्यावी. अन्यथा शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते, असा इशारा शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. ए. डी. जाधव यांनी दिला आहे.

डॉ. जाधव म्हणाले, "कोल्हापूर जिल्ह्यातील यळगूड, जंगमवाडी, बेले, हातकणंगले, शिरोळ, कागल, बाचणीत रेशीम शेती केली जाते. त्यांची विक्री रामनगर (बंगळूर) व अथणी येथे केली जाते. खासगी तत्त्वावर कोश खरेदी करणारेही जिल्ह्यात आहेत. मात्र, ते मोठ्या प्रमाणावर खरेदी कोश करू शकत नाहीत. संचार बंदीने तयार झालेले कोश विक्रीसाठी बंगळूर, अथणीला नेणे शक्य नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोश घरीच सुकवून ठेवावेत. कोश किमान तीन दिवस उन्हात ठेवून त्यावर काळा प्लास्टिक अथवा साडीचे कापड अंथरावे. कोश उघडे सुकवले तर धागा तुटतो. उन्हातील अतिनील किरणांमुळे त्यातील प्रथिने कमकुवत होतात. असे कोश धागा केंद्रांचे नुकसान करतात. संगोपन घरातील रॅकवर कोश एका थरात पसरून ठेवावेत. उंदीर, घुशी, लाल मुंग्यांसह अन्य किटक कोशांचे नुकसान करू शकतात. त्यामुळे कोशांना कमी दर मिळेल. कोशांपर्यंत हे घटक पोचणार नाहीत, यासाठी रॅकच्या खालच्या बाजूस ग्रीस लावावे."